# प्रेस नोट दिनांक २२/०८/२०१९

गणेशोत्सव २०१९ मध्ये गणेशमुर्ती प्रतिष्ठापना व गणेश विसर्जन मिरवणुक प्रसंगी विविध गणेश उत्सव मंडळे म्युझिक सिस्टिम (स्पिकर)/साऊंड सिस्टिम मोठया आवाज क्षमतेचे स्पिकर लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. गणेश विसर्जन मिरवणुकोमध्ये गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व म्युझिक सिस्टिम चालक हे शासनाने निर्धारीत केलेल्या ध्वनीच्या डेसिबल नियमांची मर्यादा पाळत नाहीत. मोठया आवाज क्षमतेचे स्पिकर लावल्यामुळे गणपती मंडळाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांचेकडून ध्वनीच्या मर्यादेचे वारंवार उल्लंघन केले जाते. गणेश मंडळांकडून हट्ट धरणे यामुळे पोलीस प्रशासन व गणेश मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते विविध राजकीय पक्ष, संघटना यांचे नेते व कार्यकर्ते आणि पोलीस प्रशासन यांचेमध्ये तणाव निर्माण होण्याची दाट शक्यता असते, त्यावरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते, यास प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून पुणे शहरामध्ये गणेश स्थापना ते विसर्जन या कालावधीत मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या गणेश मंडळ प्रमुखांना, त्यातील सदस्यांना व म्युझिक सिस्टिम चालकांना निर्बंध घालणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई मध्ये दाखल जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० मध्ये मा. न्यायालयाने वेळोवेळी आदेश देवून, ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) अधिनियम, २००० तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ मधील तरतुदी नुसार ध्वनी प्रदुषणाचे नियंत्रण व नियमन करणेसाठी **<u>डॉ.रवींद्र शिसवे (भा.पो.से.) पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ अन्वये प्राप्त</u>** अधिकारानूसार गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते म्युझिक सिस्टीम (स्पीकर), साउंड सिस्टम चालक व मालक यांना खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

१. मंडळाच्या वतीने वाजविण्यात येणारे साऊंड सिस्टिममधील स्पिकरच्या आवाजाची मर्यादा मा. उच्च न्यायालयाच्या दिलेल्या निर्देशानुसार विहित मर्यादेपर्यंत राहील.

२. प्रत्येक मंडळाने म्युझिक सिस्टिम (स्पिकर)/साऊंड सिस्टिम करीता पोलीस स्टेशनकडून त्याबाबतचा स्वतंत्र परवाना घेणे आवश्यक आहे.

३. मिरवणुकांमध्ये डि.जे. किंवा डॉल्बीचा वापर कोणतेही मंडळ करणार नाही.

४. मंडळामध्ये मिरवणुकांच्या वेळी व इतर वेळी वाजविण्यात येणारे म्युझिक सिस्टिम (स्पिकर) / साऊंड सिस्टिम मधील मिक्सर संचलन करणा-या व्यक्तींने स्थानिक पोलीस स्टेशनला आपली संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, मोबाईल नंबर व आधारकार्ड) देवून पोलीस स्टेशनकडून ओळखपत्र घेणे बंधनकारक राहिल.

५. सक्षम प्राधिकरणाने घोषित करण्यात आलेले शांतता क्षेत्रामध्ये आवाजाच्या मर्यादेबाबत मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र.ध्वनी प्र/२०००/प्र.क्र.२८/तां.क.३ दिनांक १६ ऑगस्ट २००० अन्वये ध्वनीक्षेपकाचे संदर्भात आपणास देण्यात आलेल्या सुचनांचे तसेच विभागवार देण्यात आलेल्या डेसिबल मीटरचा वापर करून मोठया आवाजात ध्वनीक्षेपकाच्या भिंती लावून उत्सव साजरा करणा-या मंडळांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल ध्वनीक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा खालीलप्रमाणे आहे.

| विभाग | दिवसा | रात्री |
|---|---|---|
| औद्योगिक विभाग | ७५ डेसीबल | ७० डेसीबल |
| वाणिज्य झोन | ६५ डेसीबल | ५५ डेसीबल |
| निवासी झोन | ५५ डेसीबल | ४५ डेसीबल |
| शांतता झोन | ५० डेसीबल | ४० डेसीबल |

सदरचे निर्बंध दि.०२/०९/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून ते दि.१३/०९/२०१९ रोजीचे २२.०० वा. पर्यंत शासनाने सूट दिलेले दिवस वगळून उर्वरीत कालावधीसाठी लागू राहतील.

Scanned by CamScanner